# विशेष पोलीस वार्तापत्र,

पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

दिनांक - १५/१०/२०२५

**पोलीस स्टेशन महागांव हददीतील मौजे नगरवाडी शेतशिवारात शेतीमध्ये गांजा अंमली पदार्थ झाडे लागवड करणा-या इसमांवर NDPS कायदया अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांची कारवाई**

यवतमाळ जिल्हात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे, शस्त्र बाळगणा-या तसेच अउघड गुन्हे, आरोपी शोध, अवैध धंदे तसेच गुंगीकारक औषधद्रव्याची तस्करी समुळ उच्चाटन व्हावे याकरीता मा.पोलीस अधीक्षक श्री.कुमार चिंता (भा.पो.से) यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांना आदेशीत केले होते. त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी त्याचे अधिनस्थ पथकांना गोपनिय माहीती काढून प्रभावी छापा कारवाई करणे बाबत सुचना दिल्या आहेत.

दिनांक 14/10/2025 रोजी स्थानिक गुन्हे शाखा पथक यवतमाळ कॅम्प पुसद यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली कि, मौजे नगरवाडी ता.महागांव येथील इसम नामे-गजानन नारायण मेटकर हा त्याचे नगरवाडी शेतशिवारातील शेत सर्वे नं 12/01 यामध्ये गांजा अंमली पदार्थ झाडांची लागवड केलेली आहे अशी माहीती मिळाल्याने संदर्भात प्राप्त माहिती वरुन पथकाने तात्काळ वरिष्ठांना याबाबत अवगत करुन मौजे नगरवाडी येथील शेत सर्वे नंबर 12/01 मध्ये जावून इसम नामे-गजानन नारायण मेटकर यांस ताब्यात घेवून पंचा समक्ष त्यांच्या ताब्यातील शेताची पाहणी केली असता सदर शेतामध्ये एकूण 31 लहान मोठया आकाराची एकूण 37 किलो 500 ग्रॅम वजनांची गांजा अंमली पदार्थ झाडे असा एकूण 1,87,500/- रुचा मुददेमाल मिळून आल्याने ते जप्त करुन ताब्यात घेवून इसम **नामे-गजानन नारायण मेटकर वय 50 वर्ष रा.नगरवाडी ता.महागांव जि.यवतमाळ यांच्या विरुध्द महागांव पोलीस स्टेशन येथे गुंगीकारक औषधीद्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनिय** (NDPS) **कलम** 8(ब), 20(b),(i) **अन्वये अपराध क्रमांक 520/2025 प्रमाणे गुन्हा नोंदीसह कार्यवाही करण्यात आली आहे.**

स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ ही अवैध धंदे, शस्त्र बाळगणा-या, गुन्हे उघड करणे तसेच गुंगीकारक औषधद्रव्याची तस्करी चे उच्चटन करण्यास प्रतिबध्द असुन यापुढे यासंबंधी माहिती असल्यास सदरची माहिती जनतेने पोलीसाची कोणतीही भिती मनात न बाळगता पुरवावी व पोलीसांना सहकार्य करावे ही विनंती.

सदरची कारवाई मा पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री.कुमार चिंता (भा.पो.से) सा, मा.अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री.अशोक थोरात (म.पो.से) सा तसेच मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.हनुमंत गायकवाड सा, मा.पोलीस निरीक्षक श्री.सतीश चवरे, स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, पोलीस निरीक्षक श्री.धनराज निळे पोलीस स्टेशन महागांव,यांचे मार्गदर्शनात सपोनि/धिरज बांडे, पोउपनि/शरद लोहकरे, सफौ/मुन्ना आडे, पोहवा/संतोष भोरगे, पोहवा/तेजाब रणखांब, पोहवा/सुभाष जाधव, पोहवा/कुणाल मुंडोकार, पोहवा/रमेश राठोड, पोशि/सुनिल पंडागळे, चापोउपनि रविंद्र श्रीरामे, पोशि/राजेश जाधव सर्व नेम-स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

SGulhane.

( शुंभागी गुल्हाणे )

स.पो.नि.तथा जनसंपर्क अधिकारी

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ

Scanned with OKEN Scanner